# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २२/०८/२०२२

## मा. विशेष महासभा

**मा. विशेष महासभा सुचना क्र. ०४**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती ____________________**
**नगरसेवक / नगरसेविका,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. विशेष महासभा शुक्रवार दि. २६/०८/२०२२ रोजी दुपारी १२.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०४ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

**मा. विशेष महासभा शुक्रवार दि. २६/०८/२०२२ सभा सुचना क्र. ०४ विषयपत्रिका**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ४४ | दि. 29/04/2022, दि. 09/05/2022 (दि. 29/04/2022 रोजीची तहकुब सभा) व दि. 17/05/2022 (दि. 29/04/2022 व दि. 09/05/2022 रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| ४५ | बारवी धरण प्रकल्पासंबंधीतांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने आस्थापनेवर समावून घेणेबाबत. |
| ४६ | मिरा भाईंदर महानगरपालिकेत वाहने वाहनचालकासह इंधनासह संपूर्ण सेवा भाड्याने घेणेकामी निविदा मागविणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ४७ | भाईदर (पूर्व) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे. (खाजगी टँकरचा प्रतिफेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे.) कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |

**महानगरपालिका सचिव कार्यालय**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- २२ ऑगस्ट २०२२**

**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २६/०८ /2022

## गोषवारा

प्रकरण ८५ :- बारवी धरण प्रकल्पासंबंधीतांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने आस्थापनेवर सामावून घेणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरासाठी सन 2021 पर्यंतची पाण्याची मागणी सुमारे 225.00 द.ल.लि. पूर्ण करण्यासाठी मिरा भाईंदर शहराकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडाळाकडून अतिरिक्त 75 द.ल.ली. पाणी पुरवठा मंजूर आहे. मात्र त्यापैकी सद्यस्थितीत फक्त 40.00 द.ल.लि. पाणी पुरवठा होत आहे. मिरा भाईंदर शहराची सध्याची पाण्याची मागणी पूर्ण होण्यासाठी दि.25 जून, 2019 रोजी मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाक्षेवि) यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आलेली होती.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर बैठकीतील चर्चेनुसार एम.आय.डी.सी. यांच्या मालकीचे बारवी धरणात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा निर्माण झाल्यानंतर मिरा भाईंदर शहरास एम.आय.डी.सी. मार्फत 35.00 द.ल.लि. पाणी पुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहे.

बारवी धरणाची उंची वाढल्यामुळे प्रकल्प बांधित होणाऱ्या 1163 कुटुंबातील एका व्यक्तीस याप्रमाणे एकूण 1163 लोकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये विहित पध्दतीने सामावून घेण्याबाबत दि.18/09/2017 च्या शासन निर्णयानुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेस अतिरिक्त 75 द.ल.लि. प्रती दिन एवढया वाढीव पाणी पुरवठयानुसार येणारी एकुण 15% नुसार 179 एवढी पदे मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर तातडीने नेमणूका करणेची कार्यवाही करण्यात यावी असे मुख्य कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी दि.26/06/2019 अन्वये कळविले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-03 व वर्ग-04 संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या रिक्त असलेल्या पदांवर बारवी धरण 179 प्रकल्प बांधितांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने शासन निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेत सामावून घेणे आवश्यक आहे तसेच मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडून बारवी प्रकल्प बांधितांची अंतिम यादी प्राप्त झाल्यानंतर 179 प्रकल्प बाधितांना मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेणेकरीता मा.महासभा दि.14/08/2019, ठराव क्र.59 अन्वये मान्यता दिलेली आहे.

तद्नंतर बारवी धरणातील प्रकल्प ग्रस्तांबाबत मंत्रालयात Video Conference झाली. त्यावेळी मा.अतिरिक्त आयुक्त महोदय यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेची माहिती दिली. सदर Video Conference मध्ये बारवी धरणाची उंची वाढल्यामुळे प्रकल्प बाधित 210

उमेदवारांना मिरा भाईंदर महानगरपालिकेत सामावून घेऊन नोकरी देण्यात यावी असे निर्देश देण्यात आले. तसेच मा.प्रधान सचिव, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग यांनी बारवी धरणाची उंची वाढल्यामुळे अतिरिक्त पाणी साठयापैकी प्रस्तावित वाटपाची 15% नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेत प्रकल्प बाधितांची पदसंख्या 210 झालेबाबत दि.20/12/2020 रोजी कळविले आहे.

तसेच मा.ना.श्री.कपिल पाटील, केंद्रीय राज्यमंत्री, पंचायतीराज, मंत्रालय , भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली दि.12/07/2022 रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे बैठक झाली. सदर बैठकीमध्ये बारवी प्रकल्प बाधितांची पदे भरणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

बारवी प्रकल्प बांधितांची अंतिम यादी प्राप्त झाल्यानंतर 179 प्रकल्प बाधितांना मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेणेकरीता मा.महासभा दि.14/08/2019, ठराव क्र.59 अन्वये मान्यता दिलेली आहे. सद्यस्थितीत बारवी प्रकल्प बांधितांची सामावून घेण्याची पदसंख्या 210 असल्याने 179 प्रकल्प बाधितांना महानगरपालिकेत सामावून घेणेबाबत मा.महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळालेली आहे. उर्वरीत 31 प्रकल्प बाधित पदे महानगरपालिकेत वर्ग-03 व वर्ग-04 संवर्गातील सरळसेवेच्या रिक्त पदावर सामावून घेणेसाठी मा.महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

सबब शासनाकडून प्रकल्प बाधितांची अंतिम यादी प्राप्त झालेनंतर उर्वरीत 31 प्रकल्प बाधितांना मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी सामावून घेणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत शिफारस आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि २३/५/२०२२ वेळ ६-१.४० वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ....30.... वर्ष :- 2022/23

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. २६ / ८ /२०२२**

**प्रकरण क्र. ४६ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेत वाहने वाहनचालकासह इंधनासह संपुर्ण सेवा भाडयाने घेणेकामी निविदा मागविणेकरिता आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची एकुण ६८ वाहने असुन सामान्य प्रशासन विभागात एकुण १० वाहने महानगरपालिकेचे अधिकारी यांचे वापराकरिता विविध विभागात कार्यरत आहेत. अधिकारी व विविध विभाग अत्यावश्यक सेवा इ. ठिकाणी सदर वाहनांची संख्या अपुरी असल्याने सामान्य प्रशासन, प्रभाग समिती क्र. ०१ ते ०६ मालमत्ता कर वसुली, गणपत्ती विसर्जन, दशमॉ विसर्जन, छठपुजा कार्यक्रम, स्वच्छ सर्वेक्षण अभियान, माझी वसुंधरा अभियान, पल्स पोलिओ लसीकरण, आपत्तकालीन सेवेकरिता व इतर विभागात आवश्यकतेनुसार खाजगी वाहने वाहनचालक सेवा भाडयाने घेणे आवश्यक आहे.

मे. सिताराम ट्रॅव्हलर्स यांना जा.क्र.मनपा/वाहन/७४/२०१७-१८ दि. २९/०६/२०१७ अन्वये वार्षिक कार्यादेश देण्यात आलेला आहे. तसेच मा. आयुक्त यांनी दि. २७/०८/२०१८, दि. २५/०२/२०१९, दि. १७/०४/२०२० रोजीने आवश्यक सेवा व महानगरपालिकेच्या विविध विभागातील सेवा नियमित चालु ठेवण्यासाठी नविन ठेकेदारास प्रत्यक्ष कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देणेस महापालिका अत्यावश्यक सेवा म्हणुन महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मे. सिताराम ट्रॅव्हलर्स यांना दि. ३१/०७/२०२१ रोजी पर्यंत देयक प्रदान करण्यात आलेले आहे. सन २०२२-२३ करिता रु. १.७५ कोटी इतकी तरतुद उपलब्ध केलेली होती. परंतु सदरील तरतुद सपलेली असल्याने वाहन विभागाकडे मे. सिताराम ट्रॅव्हलर्स यांचे मागील देयक प्रदान करणेकामी पुरेशी तरतुद उपलब्ध नाही. नव्याने निविदा मागविण्यापुर्वी मे. सिताराम ट्रॅव्हलर्स यांना २.०० कोटी इतक्या रकमेची तरतुद उपलब्ध करून दयावी लागणार आहे.

मे. सिताराम ट्रॅव्हलर्स यांचे वाहने वाहन चालकासह भाडे तत्वावर इंधनासह (संपुर्ण सेवा) भाडयाने घेणेकामी दि. २९/०६/२०१७ रोजी कार्यादेश दिलेला असल्याने त्यांनी सादर केलेले दर सन २०१७-१८ या वर्षाचे असल्याने सन २०२२-२३ या वर्षात पेट्रोल / डिझेल / इंधन यांची तसेच वाहने वाहनचालक यांचे दर आजचा बाजारभाव पाहता वाढलेले आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात खाजगी वाहने वाहनचालकासह इंधनासह संपुर्ण सेवा भाडे तत्वावर ठेका घेणेकरिता लेखाशिर्षातील तरतुद संपलेली असल्याने मे. सिताराम ट्रॅव्हलर्स यांस मागील उर्वरित देयके प्रदान करणेकामी रु. २.०० कोटी तसेच नव्याने निविदा मंजुर झाल्यानंतर खाजगी गाडया भाडयाने घेणेकरिता वाढीव रक्कम रु. ५.०० कोटी इतक्या तरतुदीस व नव्याने वार्षिक निविदा मागविणेकामी मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

**उप.आयुक्त (वाहन)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

गोषवारा प्राप्त दि. २५/८/२०२२ वेळ ०२:४०

मा. ~~स्थायी~~ समिती / मा. महासभा गोषवार नोंद

रजिस्टर अ. क्र ....39........ वर्ष : 2022/23

लिपीक

नगरसचिव विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

मा. महासभा दि. २६/०८/२०२२

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( ४७ ) :-** भाईंदर (पुर्व), येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे. (खाजगी टँकरचा प्रतिफेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे.) कामास आर्थिक व प्रशासकिय मंजूरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा पाणी पुरवठा विभाग हा अत्यावश्यक सेवेत मोडत असून महानगरपालिकेतर्फे दैनंदिन पाणी पुरवठयाचे वितरण हाताळले जाते. महानगापालिकेमार्फत मनपा हद्दीतील इमारतींना आवश्यकतेनुसार टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्याचे मनपाचे धोरण आहे. सदर टँकर पाणी पुरवठा हा जलजोडणी नसलेल्या इमारतींना तसेच जलवाहिन्यांच्या अंतिम टप्प्यातील कमी दाबाने पाणी पुरवठा होणाऱ्या इमारतींना व खाजगी कार्यक्रमांना मागणी केल्यास मनपामार्फत रु.1,000/- प्रति फेरा व झोपडपट्टी भागात रु.500/- प्रति फेरा इतके दर आकारुन पुरविण्यात येतात. या व्यतिरिक्त आदिवासी पाडे, धार्मिक कार्यक्रम व दुषित पाणी पुरवठा होणाऱ्या इमारती, तसेच मनपाची कार्यालये यांना मोफत पाणी पुरवठा करणे महानगरपालिकेचे दायित्व आहे. सदर योजना ना नफा ना तोटा या तत्वावर राबवली जाते. उपरोक्त टँकर मनपा भाडे तत्वावर घेऊन पाणी पुरवठा केला जातो.

तरी, सदर कामी वार्षिक अंदाजित खर्च रक्कम रु.2,00,00,000/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम अत्यावश्यक असल्याने मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. ०१/०८/२०२२ स. १०.५० वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नों.
रजिस्टर अ. क्र ....३२........ वर्ष :- २०२२-२३

नगर सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका